**प्रेस नोट** दि. ०७/०१/२०२२

**भारतीय रिजर्व बॅंक, DRDO Government of Ministry of Defence, Archeaeological Survay Of India, Atomic Energy Regulatory Board, GOI, BARC, ISRO, RAW, Deutsche Bank सह इतर शासकीय संस्थेची बनावट कागदपत्रे तयार करून लोकांची फसवणुक करणाऱ्या टोळीस गुन्हे शाखेच्या युनिट ७ कडून जेरबंद.**

| | |
|---|---|
| कक्ष | गु.प्र.शा., गु.अ.वि., कक्ष-७, घाटकोपर, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा. गु.अ.वि., गु.र.क्र. ०१/२०२२ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ भा.द.वि. (भांडुप पो.ठाणे गु.र.क्र.०९/२०२२) |
| गुन्हा घडला, दिनांक व वेळ | दि.०६.०१.२०२२ रोजीचे १६.०० वाजताचे सुमारास |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.०७.०७.२०२१ रोजीचे ०४.०० वा |
| घटनास्थळ | अनंता हॉटेल एल.बी.एस. रोड, भांडुप, मुंबई |
| अटक आरोपीतांची संख्या | ०४ पूरूष |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | भारतीय रिझर्व बॅक व इतर भारतीय शासकिय कार्यालय, परदेशातील बॅक आणि तेथील कंपन्या यांचे बनावट कागदपत्रे, ४ मोबाईल फोन, ०१ लॅपटॉप व रोख रु. ३०,०००/- |

**थोडक्यात प्रेसनोट :-**

दिनांक ०५/०१/२०२१ रोजी फिर्यादी यांना त्यांचे ओळखीच्या व्यक्तीकडून माहिती मिळाली की, इसम नामे भास्कर राव येसुपोगु रा.ठि. खम्मम, आंध्रप्रदेश हा JW Marriott, जुहु, मुंबई या हॉटेलमध्ये आला असून त्यास फायनान्सची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने फिर्यादी त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीसह नमुद इसमास भेटण्यासाठी दि. ०५.०१.२०२२ रोजी JW Marriott, जुहु मुंबई येथे गेल्या असता, त्यांना भास्कर राव येसुपोगु याने सांगितले की, त्याला मिळालेला एक प्रिशियस मेटल पॉट हा त्याने व त्याचे साथीदार नामे १) अरिंदम अतिंद्रकुमार डे २) राजविंद्र अशोक मेहरा ३) सुमित कमल पंजाबी व ४) नियाझ उर्फ कबीर यांच्या मदतीने CAMECO CORPORATION, CANADA या कंपनीला विकले असुन, सदर कंपनीकडुन त्यांना १५ बिलीयन युरो एवढी रक्कम मिळाली आहे. सदरच्या रक्कमेपैकी ६.७ बिलीयन युरो ( ५५ हजार करोड भारतीय रूपये ) एवढी रक्कम ही त्याच्या अकांउंट वर आली असुन, सदरची रक्कम फॉरेन एक्सचेंज डिपार्टमेंट, RBI यांनी गोठवुन ठेवली आहे. सदरची रक्कम प्राप्त करण्यासाठी २७ करोड रूपये टॅक्स त्यांना RBI ला भरावयाचा आहे. त्याकरीता लोकांना पैस गुंतवण्यास सांगुन त्यांना त्याबदल्यात मिळणाऱ्या रकमेच्या ४० टक्के हिस्सा देण्याचे सांगुन त्या सदंर्भात काही दस्तऐवज त्यांना दाखविले होते. सदर आमिषाला बळी पडुन फिर्यादी यांनी भास्कर राव येसुपोगु यास ॲडव्हास रक्कम रु. ३०,०००/- दिले व उर्वरीत रक्कम दि. ०६.०१.२०२२ रोजी भांडुप, मुंबई या ठिकाणी दुपारी १२.०० वाजता भेटुन दयायचे ठरले होते. त्यांनतर फिर्यादी या घरी आल्यावर थोडया वेळाने त्यांना त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीकडून समजले की, भास्कर राव येसुपोगु हा RBI मध्ये अडकलेले पैसे सोडवण्या संदर्भात वरीलप्रमाणे माहिती देवुन लोकांची फसवणुक करतो. त्यानंतर फिर्यादी यांना त्यांची नमुद इसमाकडून फसवणुक झाल्याची खात्री झाल्याने त्यांनी गु.प्र.शा., गु.अ.वि. कक्ष-७, घाटकोपर, मुंबई या कक्षात समक्ष येवून सदरबाबत कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक मनिष श्रीधनकर यांना माहिती दिली.

प्राप्त माहितीची शहानिशा करून कारवाई करण्याकरीता मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली प्र.पो.नि. श्रीधनकर, पोलीस पथक यांनी एल.बी.एस. रोड, भांडुप येथे कोणासही संशय येणार नाही अशा रितीने विखरून थांबले. ठरल्याप्रमाणे पो.उप.नि. लोहकरे यांचा सांकेतीक संदेश प्राप्त झाल्याने पोलीस पथकाने हॉटेलमध्ये छापा टाकला असता, सदर ठिकाणी काही इसम मिळून आले. त्यापैकी एक असलेला भास्कर राव येसुपोगु याचेकडे फिर्यादी यांनी अंगुलीनिर्देशित करुन, सदर इसमास दिनांक ०५/०१/२०२२ रोजी फिर्यादी यांनी ३०,०००/- रूपये टोकन म्हणून दिले असल्याचे सांगितले. त्यानंतर नमुद इसमाकडुन व त्याचे इतर साथीदारांकडून भारतीय रिझर्व बॅंक व इतर भारतीय शासकिय कार्यालय, परदेशातील बॅंक आणि तेथील कंपन्या यांचे बनावट कागदपत्रे, १० मोबाईल फोन, ०१ लॅपटॉप तसेच फिर्यादी यांचेकडून त्यांनी स्विकारलेले रोख रु. ३०,०००/- हे जप्त करण्यात आले व नमुद इसमांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यातील इसमांकडे अधिक चौकशी केली असता, इसम नामे भास्कर राव येसुपोगु याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने त्याला मिळालेला एक प्रिशियस मेटल पॉट हा त्याने व CAMECO CORPORATION, CANADA या कंपनीला विकले असुन सदर कंपनीकडुन त्यांना १५ बिलीयन युरो एवढी रक्कम मिळाले असुन, सदरच्या रकमेपैकी ६.७ बिलीयन युरो (५५ हजार करोड भारतीय रूपये) एवढी रक्कम ही त्याच्या अकांउंट वर आली असुन, सदरची रक्कम फॉरेन एक्सचेंज डिपार्टमेंट, RBI यांनी गोठवुन ठेवली आहे. सदरची रक्कम प्राप्त करण्यासाठी २७ करोड रूपये टॅक्स त्यांना RBI ला भरावयाचा असल्याचे फिर्यादी यांना भासवले व त्यासदंर्भात काही बनावट दस्तऐवज फिर्यादी यांना दाखविले. त्याकरीता फिर्यादी यांना पैस गुंतवण्यास सांगुन व त्यांना त्याबदल्यात मिळणाऱ्या रकमेच्या ४० टक्के हिस्सा देण्याचे आमिष दाखवुन त्यांचेकडुन ॲडव्हास रक्कम रु. ३०,०००/-स्वीकारुन त्यांची फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाल्याने फिर्यादी यांनी त्यांचेविरोधात दिलेल्या तक्रारीवरुन भांडुप पो.ठाणे गु.र.क्र.०९/२०२२ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ भा.द.वि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला व सदरचा गुन्हा गु.प्र.शा.,गु.र.क्र. ०१/२०२२ प्रमाणे कक्ष-७ चे तपासावर घेण्यात आला आहे. सदर गुन्हयात खालील आरोपीतांना अटक करण्यात आले असून त्यांना रिमांडकामी मा. न्यायालयात हजर केले असता, मा. न्यायालयाने त्यांस दि. ११/०१/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावलेली आहे.

**अटक आरोपी :-**

१) एक पुरूष आरोपी, वय ४७ वर्षे, रा.ठी. मधुपल्ली खंम्मम, आंध्रप्रदेश.
२) एक पुरूष आरोपी, वय ३८ वर्षे, रा.ठी. जिल्हा साउथ चोबिस परागणा, कोलकत्ता, पश्चिम बंगाल.
३) एक पुरूष आरोपी, वय ५० वर्षे, रा.ठी. यशवंत गौरव नालासोपारा (प.) ठाणे.
४) एक पुरूष आरोपी, वय ३१ वर्षे, रा.ठी. मानकापुर, कोराडी रोड, नागपुर.

इतर पाहिजे आरोपींचा तपास चालु आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलींद भारंबे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. विरेश प्रभु, पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. निलोत्पल, सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पूर्व) श्री. सोपान निघोट, **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. मनिष श्रीधनकर** यांचे मार्गदर्शनाखाली **पोलीस उप निरीक्षक अतिष लोहकरे, माधवानंद धोत्रे,** स्वप्निल काळे, नामदेव परबळकर, पोलीस हवालदार दिपक पवार, अरूण सावंत, पोलीस नाईक विशाल शिंदे, सचिन गलांडे, पोलीस शिपाई जितेंद्र पाटील, महेश सावंत यांचेसह पोलीस नाईक चालक संतोष धुमाळ, पोलीस शिपाई चालक दिलीपराव राठोड यांनी पार पाडली आहे.

*****D-1/01/2022*****